Vol II Issue V Nov 2012

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

# Monthly Multidiciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 5, Nov. 2012
ISSN:-2231-5063 Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

GRT

# भारताच्या आर्थिक विकासात श्रीमती इंदिरा गांधी यांचे योगदान

**संतोष कु-हे**

लोकप्रशासन विभागप्रमुख
स्वा. सै. सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा जि. परभणी

*सारांश :*

भारताच्या प्रथम महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी देशाच्या आर्थिक तसेच सर्वांगीण विकासाकरिता लक्षणीय प्रयत्न केले होते. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच आज भारतामध्ये गरीबीचे प्रमाण कमी झालेले दिसते. श्रीमती इंदिरा गांधींनी विविध आर्थिक सुधारणांचा अवलंब केला होता, ज्यामध्ये प्रामुख्याने बँकाचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे बंद करणे, गरीबी निर्मुलनासाठी विशेष प्रयत्न आदींचा देशाच्या आर्थिक विकासावर दुरगामी सकारात्मक परिणाम आजच्या काळात पाहता येतो.

**विशेष शब्द :**

आर्थिक विकास, राष्ट्र विकास, आर्थिक सुधारणा इत्यादी

**प्रस्तावना :**

राष्ट्रविकासात सर्वात महत्वाचा घटक म्हणजे आर्थिक प्रगती होय. प्रत्येक राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीवरुनच राष्ट्राची उन्नतीचा विचार केला जातो. याचे कारण म्हणजे सर्वच विकासाचा पाया हा आर्थिक विकास होय. राष्ट्रविकासाच्या दृष्टीने स्वातंत्र्योत्तर काळात अनेक विचारवंतांनी त्याचबरोबर राज्यकर्त्यांनी अर्थविकासाच्या माध्यमातून राष्ट्रविकास साधण्याचा सतत प्रयत्न केला. ज्यामध्ये प्रामुख्याने भारताचे प्रथम पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु, लालबहादूर शास्त्री, त्यांच्याबरोबरच श्रीमती इंदिरा गांधी यांचा विचार केला जातो. राष्ट्रउन्नती खया अर्थाने साधवयाची असेल तर राष्ट्रविकास साधण्याकरिता पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी हरितक्रांती घडवून आणली. तर श्रीमती इंदिरा गांधी यांनी आर्थिक विषमता हटविण्याकरिता राष्ट्रीयीकरणाचा मार्ग अवलंबविला आणि राष्ट्रविकास साधण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

**उद्देश :**

या संशोधन लेखाचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत.
१. श्रीमती इंदिरा गांधींनी आर्थिक विकासाकरिता केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.
२. त्यांचे आर्थिक विकासावरिल विचार समजावून घेणे.

**माहिती संकलन :**

या लेखासाठी माहितीचे संकलन प्रामुख्याने द्वितीयक स्त्रोतांमधून करण्यात आलेले आहे. ज्यामध्ये विविध ग्रंथ, लेख संपदा तसेच इंटरनेट आदिंवर प्रकाशीत झालेली माहिती वापरण्यात आली आहे.

**श्रीमती इंदिरा गांधींचा अल्प परिचय :**

नेहरु घराण्याने राष्ट्राला दिलेले हे रत्न इंदिरा गांधी, याचा जन्म १९ नोव्हेंबर १९१७ रोजी झाला. सामान्य मुलांपेक्ष इंदिरा गांधी यांचे बालपण वेगळे होते. कारण, अगदी बालवयात त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेवून आपले वेगळेपण स्पष्ट केले होते. शैक्षणिक जीवन संघर्षमय होते. शैक्षणिक जीवनाती शांतीनिकेतन मधील त्यांचा कालावधी महत्वपूर्ण ठरला, कारण याच कालावधीत रविंद्रनाथ टागोर यांच्या विचारांनी त्या प्रभावित झाल्या. त्यांच्या विचारांचा पुढे राष्ट्रविकासाकरिता उपयोग झाला. त्याचबरोबर याच कालावधीत साहित्यकला, चित्रकला यांच्यात आवड निर्माण झाली. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या सामाजिक विचारांवर जॉन ऑफ अर्क या पूस्तकाचा प्रभाव झाला. प्रचंड आत्मविश्वास आणि निर्णय क्षमता हे महत्वपूर्ण गुण म्हणून विचारात घेतले जातात. यांच्या आधारावरच त्यांनी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेवून राष्ट्राला उन्नतीकडे नेले.

**पंचवार्षिक योजना यासंदर्भातील विचारः**

आर्थिक विकासातील सर्वात महत्वपूर्ण टप्पा म्हणजे त्या राष्ट्राने आखलेली आर्थिक पंचवार्षिक योजना हा होय. पंचवार्षिक योजनेच्या संदर्भात श्रीमती इंदिरा गांधी यांचे विचार असे होते की, पंचवार्षिक योजना अशा स्वरुपाची असावी की, जिच्या माध्यमातून वास्तविक परिस्थितीचा आढावा घेवून ती तयार करण्यात यावी. असे

झाले तरच समाजवाद आर्थिक स्वतंत्रता, जीवनस्तर योग्य दिशेने जावू शकतो. श्रीमती इंदिरा गांधी यांनी २१ डिसेंबर १९७१ च्या योजना आयोगाच्या बैठकीत व्यक्त केलेले विचार असे स्पष्ट करतात, मुझे विश्वास है की, भविष्य में अधिकतम आत्मनिर्भरता के आधारपर आर्थिक विकास की योजनायें राष्ट्र को संपन्न एवं शक्ती बना सकती हैं. मेरे विचारसे अर्थव्यवस्था के लिए उपयुक्त निती निर्धारण में तीन तथ्यों का ध्यान रखना चाहिए, और वो है, आत्मनिर्भरता की दिशा में तेजी से अग्रेसर होना चाहिए, सरकारद्वारा घोषित सामाजिक, आर्थिक उद्देशोंकी प्राप्ती तथ नजदिकी देश को सहायता हमारी योजनामें विदेशी सहायता पर आधारित नहीं होनी चाहिए, क्योंकी विदेशी सहायता प्राप्त करनेवाले देश पर कठिन परिस्थितीयों में दबाव डाला जा सकता है. विदेशी सहायता पर पुरी तरह से आश्रीत होनेपर हमारी आर्थिक व्यवस्था अच्छी नही रह सकती. अपने साधनों की अधिक बचत करनी चाहिए.

**आर्थिक विकासाच्या संदर्भातील विचारः**

आर्थिक विकास हे राष्ट्रविकासातील पहिले पाउल होय. या अनुषंगाने त्या नेहमी म्हणत असत की, राष्ट्रविकासातील सर्वात मोठा अडथळा म्हणजे आर्थिक विषमता हा होय. गरीबी हा केवळ गरीबांवरच नाही तर देशावरसुध्दा अन्याय होय. त्यांनी असे मानले की अनुषंगाने त्यांनी गरीबी दुर करण्यासाठी सतत प्रयत्न केले. आर्थिक विकास साधण्यासाठी श्रीमती इंदिरा गांधी यांनी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले, ज्यामध्ये १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण, २० कलमी आर्थिक कार्यक्रम, पंचसुत्री आर्थिक कार्यक्रम हा होय. ज्यामध्ये खालील बाबींचा समावेश होता.

१. संस्थानिकांचे तनखे रद्द करणे.
२. जनरल इन्शुरन्सचे राष्ट्रीयीकरण.
३. नागरी मालमत्तेवर मर्यादा.
४. शेतकयांकडे असलेल्या धान्याची एकाधिकार खरेदी.
५. कच्च्या मालाची आयात सरकारी क्षेत्रात घेणे.

अश स्वरुपाचे निर्णय त्यांनी आर्थिक विकासाच्या किंवा समानतेच्या दृष्टीकोनातून घेतले. आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील त्यांनी आर्थिक विकासाच्या दृष्टीने परस्पर सहकार्याला महत्व दिले. कारण, परस्पर सहकार्याशिवाय आर्थिक विकास साधताच येत नाही. राष्ट्रा-राष्ट्रांमधील आर्थिक विषमता हे अनेक समस्यांचे मुळ मानले आणि राष्ट्रा-राष्ट्रांमधील आर्थिक समानता दुर व्हावी असे त्यांनी स्पष्ट केले.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्रासमोर अनेक समस्या होत्या, ज्यामध्ये आर्थिक विषमता हे प्रमुख समस्या होती. शेकडो संस्थाने सांभाळीत होते. त्यांना सरकारकडून तनखे व विशेष अधिकार मिळत. सामान्य नागरिकांपेक्ष वेगळा दर्जा देण्यात येत होता. त्यामुळे देशच्या खजिन्यावर कोट्यावधी रुपयांचा बोजा पडत होता. याचा विचार करुन श्रीमती इंदिरा गांधी यांनी ७ सप्टेंबर १९७० रोजी वटहुकूम काढून संस्थानिकांचे तनखे बंद करुन त्यांना भरपाई देवून कायमचे बंद केले. १९ जुलै १९६९ रोजी ५० कोटी किंवा त्यापेक्षा अधिक ठेवी असलेल्या चौदा खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. त्यांच्या निर्णयाचे सर्वत्र स्वागत झाले. समाजवादी समाजरचनेचे त्यांचे हे महत्वपूर्ण पाउल होते. त्यांनी घेतलेले वरील निर्णय हे त्यांच्या प्रतगीशिल आर्थिक नितीचे एक पाउल होय. बँक राष्ट्रीयीकरणाचा त्यांनी घेतलेला निर्णय हा सामान्य जनता व श्ेतकयांच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरला. कारण, शेतकयांना आर्थिक मतद होवू लागली.

आर्थिक विकासातील आपल्या देशासमोरील सर्वात महत्वाची समस्या म्हणजे खनिज तेलाची कमतरता होय. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात जेवढ्या प्रमाणत तेलाचा शोध लागला होता, त्यामुळे अब्जावधी रुपयांचे कच्चे तेल व पेट्रोलियम यांना आयात करण्यासाठी जेवढा पैसा लागत होता, त्यामध्ये बयाच प्रमाणात बचत होवू लागली. त्याचबरोबर खनिज तेलाच्या संदर्भातील शोध इतर विकसनशील राष्ट्रास पुरविले जाते. पण खनिज तेलांच्या विहीरी अनंतकाळापर्यंत खनिज तेल पूरवू शकणार नाहीत. इंधनाच्या निर्माण होणाया समस्या, खाणीची स्थिती विचारात घेवून श्रीमती इंदिरा गांधी यांनी परमाणू शक्तीचा विकास करुन देशाला परमाणू शक्ती असणाया देशांच्या पंक्तीमध्ये बसविले आणि राष्ट्राचा आर्थिक विकास घडवून आणला.

**निष्कर्ष :**

श्रीमती इंदिरा गांधी यांच्या अनेक महान कार्यायांमध्ये त्यांच्या आर्थिक नितीचा समावेश होतो. त्यांचे आर्थिक क्षेत्रातील कार्य अत्यंत व्यापक स्वरुपाचे आहे. त्यांनी आर्थिक प्रगतीच्या अनुषंगाने अनेक महत्वपूर्ण निर्णय घेवून देशाला प्रत्येक क्षेत्रात प्रगतीपथावर नेले. राष्ट्रविकासातील सर्वात महत्वाचा घटक म्हणून आर्थिक विकासाकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य अत्यंत मोलाचे ठरले. याचा सर्वात अधिक उपयोग देशातील गरिब जनता व सर्वसामान्य माणसाला झाला असेच स्पष्ट होते. वर्तमान व भविष्यात येणाया आर्थिक विकासातील अडचणी कमी करावयाच्या असतील तर श्रीमती इंदिरा गांधी यांची अर्थनिती अत्यंत उपयुक्त असून देशासमोरील आर्थिक समस्या कमी करण्यास मदत होईल. व राष्ट्रविकास साधला जावू शकतो. श्रीमती इंदिरा गांधी यांची अर्थनिती ही राष्ट्राला विकासाच्या दिशेने नेणारी आहे, तसेच त्याचा उपयोग राष्ट्राला अनंत काळाकरिता होईल.

**सारांश :**

राष्ट्रातील समस्यांची जाणीव करुन घेवून राष्ट्रविकासाच्या दृष्टीकोनातून निर्णय घेणे आवश्यक आहे. खया अर्थाने राष्ट्रविकास साधवयाचा असेल तर राष्ट्राला आर्थिक विकासाच्या दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे. जे की, श्रीमती इंदिरा गांधी यांनी केले होते. श्रीमती इंदिरा गांधी यांनी मानले होते की, आर्थिक विकासात प्रामुख्याने शेती, उद्योगधंदे, सामान्य जनता यांना केंद्रस्थानी मानुन आर्थिक विकास साधणे गरजेचे आहे. तसे झाले तरच राष्ट्रविकास जलद गतीने होत राहील. या तत्वानुसार आजच्या राज्यकर्त्यांनी देखील भारताच्या आर्थिक विकासाकरिता प्रयत्न करावेत.

**संदर्भ :**

१. पंढरीनाथ रावजी पाटील, इंदिरा गांधी : तेजस्वी नेतृत्व व कर्तृत्व, प्रथमावृत्ती १९८०.
२. वि. श्री. फडके, इंदिरा : जीवन आणि विचार, निलकंठ प्रकाशन, पुणे.
३. यशवंत हडप, इंदिरा गांधी.
४. इंदिरा गांधी, स्वप्नसिध्दीची दहा वर्ष.
५. माधव मोर्डेकर, माझे सत्स्वप्न.
६. From Selected Speeches of Mrs. Gandhi

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

* International Scientific Journal Consortium Scientific
* OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net